११

## MAHARASHTRA ACT No. III OF 1981

## THE INDUSTRIAL DISPUTES (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1982

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ८ जानेवारी १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोले,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. III OF 1982

## AN ACT FURTHER TO AMEND THE INDUSTRIAL DISPUTES ACT, 1947 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ८ जानेवारी १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

### औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९४७ चा १४. **ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९८१ चा महा. अध्या. १६. **आणि ज्याअर्थी**, यात यापुढे नमूद केलेल्या प्रयोजनासाठी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यात सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती, आणि म्हणून त्यांनी औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९८१, दिनांक २७ ऑक्टोबर १९८१ रोजी प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, आता भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, २७ ऑक्टोबर १९८१ रोजी अमलात आल्याचे समजण्यात येईल.

१९४७ चा १४. २. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २५-ट मध्ये, पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९४७ चा अधिनियम क्रमांक १४ यातील कलम २५-टची सुधारणा.

"(१-क) पोट-कलम (१) च्या उपबंधांस बाध न आणता समुचित शासनास, वेळोवेळी, **शासकीय राजपत्रातील**, अधिसूचनेद्वारे, कलम २५-ण आणि कलम २५-द यांचे उपबंध हे, जेथवर कलम २५-ग च्या पोट-कलम (१) किंवा (२) यांच्या उल्लंघनाशी त्यांचा संबंध येत असेल तेथवर, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे, तीनशेपेक्षा कमी परंतु शंभरपेक्षा कमी नसतील इतके कामगार ज्या औद्योगिक आस्थापनेत मागील बारा महिन्यांमध्ये, प्रत्येक कामाच्या दिवशी

सरासरीनें कामावर लावण्यात आले असतील त्या औद्योगिक आस्थापनेलादेखील (जी हंगामी स्वरूपाची किंवा ज्यामधील काम खंडितपणे करण्यात येत असेल अशी आस्थापना नसेल) लागू करता येतील ".

१९४७ चा अधिनियम क्रमांक १४ यातील कलम २५-ण ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

३. मुख्य अधिनियमात, कलम २५-ण ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

कोणताही उपक्रम बंद करण्याची परवानगी मिळविण्याकरिता तो बंद करण्यापूर्वी नव्वद दिवस आधी अर्ज करणे.

" २५-ण. (१) ज्या औद्योगिक आस्थापनेला हे प्रकरण लागू आहे तिचा उपक्रम बंद करण्याचा ज्याचा उद्देश असेल असा नियोक्ता, ज्या दिनांकापासून तो बंद करण्याचे योजिले असेल त्या दिनांकाच्या निदान नव्वद दिवस अगोदर, समुचित शासनाकडे विहित रीतीने परवानगीसाठी अर्ज सादर करील व त्यात, उपक्रम बंद करण्याच्या उद्देशाची कारणे स्पष्टपणे नमूद करील. नियोक्ता अशा अर्जाची एक प्रत कामगारांच्या प्रतिनिधींवर विहित रीतीने बजावील :

परंतु, इमारती, पूल, रस्ते, कालवे, धरणे यांचे बांधकाम किंवा अन्य बांधकामे करण्यासाठी स्थापन केलेल्या उपक्रमास या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज मिळाल्यावर, समुचित शासनाला, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि अर्जदार व कामगारांचे प्रतिनिधी यांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून, आदेशाद्वारे, उपक्रम बंद करण्यास परवानगी देता येईल, किंवा उपक्रम बंद करण्याच्या उद्देशाची कारणे, योग्य व पुरेशी नाहीत किंवा ती सद्भावनेने प्रेरित नाहीत किंवा ती अत्यंत गैर किंवा अन्याय्य आहेत, आणि अशा प्रकारे उपक्रम बंद केल्यास, सामान्य जनतेच्या हितास ते बाधक ठरेल, याबद्दल समुचित शासनाची खात्री झाली तर त्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून, आदेशाद्वारे, परवानगी नाकारता येईल आणि असा उपक्रम बंद न करण्याबद्दल नियोक्त्यास निदेश देता येईल. समुचित शासन, या पोट-कलमान्वये त्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाची एक प्रत त्याच वेळी कामगारांच्या प्रतिनिधींना पाठवील.

(३) पोट-कलम (१) अन्वये परवानगीसाठी अर्ज करण्यात आलेला असेल आणि समुचित शासनाने, त्यास अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतीत, नियोक्त्याला परवानगी नाकारल्याचे कळविले नसेल त्या बाबतीत, उक्त साठ दिवसांची मुदत संपल्यावर, मागितलेली परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाचा परिणाम झालेला कोणताही नियोक्ता किंवा कोणताही कामगार किंवा पोट-कलम (३) अन्वये जी दिली असल्याचे मानण्यात आलेले असेल अशा परवानगीचा परिणाम झालेला कोणताही कामगार यास, यथास्थिति, आदेशाच्या तारखेपासून किंवा परवानगी ज्या तारखेपासून देण्यात आली असल्याचे मानण्यात आलेले असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, समुचित शासनाकडून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीमध्ये निर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी किंवा संपूर्ण राज्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा औद्योगिक न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. औद्योगिक न्यायाधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अपील दाखल केल्याच्या तारखेपासून शक्यतो तीस दिवसांच्या आत, यथास्थिति, समुचित शासनाचा आदेश किंवा दिली असल्याचे मानण्यात आलेली परवानगी, एकतर कायम करणारा किंवा रद्द करणारा आदेश काढील.

(५) औद्योगिक न्यायाधिकरणाकडे करता येईल अशा अपिलास, आणि अशा अपिलात औद्योगिक न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही आदेश यास अधीन राहून पोट-कलम (२) अन्वये समुचित शासनाने काढलेला कोणताही आदेश किंवा पोट-कलम (३) अन्वये दिली असल्याचे मानण्यात आलेली कोणतीही परवानगी अंतिम असेल आणि उक्त आदेश वा परवानगी संबंधित सर्व पक्षकारां-वर बंधनकारक असेल.

(६) समुचित शासनाने, पोट-कलम (२) अन्वये काढलेला (उपक्रम) बंद करण्याच्या परवानगीस नकार देणारा कोणताही आदेश, उक्त आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीसाठी, औद्योगिक न्यायाधिकरणाने अपिलात त्या आधी तो रद्द न केल्यास, अमलात राहील.

(७) पोट-कलम (१) खाली परवानगीसाठी कोणताही अर्ज करण्यात आलेला नसेल किंवा (उपक्रम) बंद करण्यास परवानगी नाकारण्यात आलेली असेल त्या बाबतीत, उपक्रम बंद करण्याचे कृत्य, तो बंद करण्यात आल्याच्या तारखेपासून अवैध असल्याचे मानण्यात येईल, आणि कामगार हा, जणू काही त्यास नोटीस देण्यात आलेली नाही असे समजून, त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील सर्व लाभ मिळण्यास पात्र असेल.

(८) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उपक्रमातील अपघात किंवा नियोक्त्याचा मृत्यू किंवा यासारख्या इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे तसे करणे आवश्यक आहे याबद्दल, समुचित शासनाची खात्री पटेल तर त्यास, आदेशाद्वारे, अशा उपक्रमाच्या संबंधात आदेशामध्ये विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी, पोट-कलम (१) चे उपबंध लागू असणार नाहीत, असा निदेश देता येईल.

(९) पोट-कलम (२) अन्वये एखादा उपक्रम बंद करण्यास परवानगी देण्यात आली असेल किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा उपक्रम बंद करण्यास परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात आले असेल त्या बाबतीत, या कलमाखालील परवानगीसाठीच्या अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वी त्या उपक्रमामध्ये, एक वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी, सतत सेवेत असणारा उक्त उपक्रमातील प्रत्येक कामगार, जणू काही कलम २५-ढ अन्वये त्याला कामावरून कमी करण्यात आले आहे असे समजून, त्या कलमात विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे नोटीस आणि भरपाई मिळण्याला हक्कदार असेल.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २५-द ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९४७ चा अधिनियम १४ याच्या कलम २५-द ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

"**२५-द.** (१) कलम २५-ण; पोट-कलम (१) च्या उपबंधांचे अनुपालन केल्याशिवाय, जो एखादा उपक्रम बंद करील अशा कोणत्याही नियोक्त्याला, दोषसिद्धीनंतर, सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील. उपक्रम बंद केल्याबद्दल शास्ती.

(२) कलम २५-ण चे पोट-कलम (२) किंवा कलम २५-त याखाली दिलेल्या निदेशांचे उल्लंघन करील अशा कोणत्याही नियोक्त्याला, दोषसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील आणि उल्लंघन करणे चालू राहिले असेल त्याबाबतीत, दोषसिद्धीनंतर, ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहिले त्या प्रत्येक दिवसाला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

निरसन व व्यावृत्ति.

५. (१) औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९८१ याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८१ चा महा. अध्या. १६.

(२) असे निरसन करण्यात आले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना अथवा काढण्यात आलेला आदेश अथवा करण्यात आलेला कोणताही नियम धरून) करण्यात आलेले कोणतेही कृत्य किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेले कृत्य, करण्यात आलेली कार्यवाही किंवा काढण्यात आलेली अधिसूचना अथवा काढण्यात आलेला आदेश अथवा करण्यात आलेला नियम असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.